POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२४५ ● मुंबई, सोमवार, ७ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## वक्फनंतर चर्चच्या जमिनीवर निशाणा?

### ‘ऑर्गनायझर’च्या बातमीनंतर विरोधकांचे संघाकडे बोट

**बातमीत काय?**

- भारतात सर्वाधिक जमीन कोणाकडे? या नावाने शशांककुमार द्विवेदींचा लेख द ऑर्गनायझरमध्ये छापण्यात आला होता.
- सर्वाधिक जमीन कॅथलिक चर्चकडे की वक्फ बोर्डाकडे? असा सवाल त्यातून उपस्थित करण्यात आला होता.
- कॅथलिक संस्थांकडे देशात ७ कोटी हेक्टर्स जमीन असल्याचा दावा आहे.
- कॅथलिक संस्था ही सर्वाधिक जमीन असणारी सर्वात मोठी बिगर सरकारी संस्था.
- २०२१ च्या माहितीनुसार कॅथलिक चर्चकडे १७ कोटी २९ लाख एकर जमीन आहे.
- ब्रिटीश काळात ताब्यात यापैकी सर्वाधिक जमीन चर्चच्या ताब्यात देण्यात आली होती.
- १९६५ च्या कायद्यानुसार, ब्रिटिशांनी भाड्यानं दिलेली जागा चर्चची मानता येत नाही.
- पण १९६५ चा कायदा नीट अमलात न आणल्यानं आजही अनेक जमिनी चर्चच्या मालकीच्या आहेत.




**■मुंबई। प्रतिनिधी :**

गेले काही दिवस देशभरात वक्फ विधेयकाची चर्चा आहे. याचं कारण म्हणजे नुकताच मंजूर करण्यात आलेला वक्फ सुधारणा कायदा. हा नवा कायदा म्हणजे मुस्लिमांच्या हक्कावर गदा आहे असा आरोप इंडिया आघाडीच्या नेत्यांनी केला होता. आता वक्फनंतर मोदी सरकार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा चर्चच्या जमिनीवर डोळा आहे असा विरोधकांकडून होत आहे. पण हे आरोप करताना विरोधक नेमकं कोणत्या मुद्द्यावर बोट ठेवतात? खरंच चर्चकडे वक्फपेक्षा जास्त जमीन आहे का? पाहूयात हा स्पेशल रिपोर्ट.

वक्फ झालं... आता यांचा निशाणा चर्च, बौद्ध, शीख, हिंदू देवस्थानांच्या जमिनीवर डोळा. वक्फ दुरुस्ती विधेयक नुकतंच मंजूर झालं आणि त्याच्या अवघ्या दोन दिवसांनी शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी केलेलं हे विधान. वक्फनंतर चर्चच्या ताब्यात असलेल्या जमिनी भाजप आणि आरएसएसच्या निशाण्यावर असल्याचा घणाघात उद्धव ठाकरेंनी केला. यामागचं कारण ठरतंय ते संघाचं मुखपत्र ऑर्गनायझरमधील एक बातमी.

**वक्फनंतर चर्च निशाण्यावर?**

याचसंदर्भात काँग्रेसचे राहुल गांधी यांनीही ट्विटरवर पोस्ट करत संघाकडे बोट दाखवलं होतं. वक्फ दुरूस्ती कायदा हा मुस्लिम समाजावरचा हल्ला आहे. भविष्यात इतर समुदाय देखील निशाण्यावर आहेत. लवकरच आरएसएस ख्रिश्चन समूदायाला लक्ष्य करेल. या सगळ्यांपासून वाचण्यासाठी संविधान ही एकमेव ढाल आपल्याकडे आहे. अशा हल्ल्यापासून देशाला वाचवणं हे आपलं सामूहिक कर्तव्य आहे असं राहुल गांधी म्हणाले होते.

भारतात वक्फ बोर्डाकडे साधारण ३९ लाख एकर जागा आहे. पण त्याहीपेक्षा जागा चर्चकडे असल्याचा दावा करण्यात येत आहे. ही जमीन ताब्यात घेण्यासाठी सरकार लवकरच मोहीम सुरू करणार असल्याचं भाकीत विरोधक वर्तवत आहेत.

वक्फ कायद्यावरून सुरू असलेलं राजकीय द्वंद्व थांबत नाही तोच चर्चच्या जमिनीच्या मुद्दाने डोकं वर काढलं आहे. विरोधकांच्या दाव्याप्रमाणे खरंच सरकारचा चर्चच्या जमिनी ताब्यात घेण्याचा मानस आहे की वक्ववरून तापलेल्या तव्यावर पोळी भाजण्याचा हा प्रयत्न आहे?

## अंबरनाथमध्ये चाललंय काय?

### तोंडाला मास्क लावून आले, तब्बल १६ वेळा तलवारीने सपासप वार...

**■सोलापूर। प्रतिनिधी :**

अंबरनाथमध्ये शनिवारी रात्री अज्ञात हल्लेखोरांनी भारतीय जनता पक्षाचे (भाजपा) माजी नगरसेवक रोहित राजू महाडिक यांच्या कार्यालयावर तलवारीने हल्ला केला. या हल्ल्यात कार्यालयाचे मोठे नुकसान झाले. तसेच कार्यालयात काम करणारा एक कर्मचारी जखमी झाला आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. राजू महाडिक यांच्या कार्यालयात घुसणाऱ्या हल्लेखोरांनी तब्बल १६ वेळा तलवारीने वार केले.

**नेमकं प्रकरण काय?**

रोहित महाडिक यांचे अंबरनाथ पूर्वेकडील बी केबिन रोडवरील स्वानंद शॉपिंग कॉम्प्लेक्सजवळ कार्यालय आहे. रात्री पावणे अकराच्या सुमारास अचानक तोंडाला रुमाल बांधलेले आणि हातात तलवारी घेतलेले १० ते १२ हल्लेखोर त्यांच्या कार्यालयात घुसले. त्यांनी प्रथम तलवारीने कार्यालयाच्या काचा फोडल्या. यानंतर त्यांनी कार्यालयात प्रवेश करून एका कर्मचाऱ्यावर हल्ला केला. तसेच कार्यालयातील खुर्च्यांचीही तोडफोड केली.



**पोलिसांकडून कसून शोध सुरु**

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून हल्लेखोर कोणत्या मार्गाने पसार झाले याचा शोध घेतला जात आहे. उल्हासनगर गुन्हे शाखेचे पथकही घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांकडून आरोपींच्या शोधासाठी चार पथके तैनात करण्यात आली आहेत. सध्या अंबरनाथ पूर्व, पश्चिम, बदलापूर आणि उल्हासनगर गुन्हे शाखेची पथके आरोपींचा शोध घेत आहेत. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी सुरू केली असून हल्लेखोरांचा माग काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

या संपूर्ण हल्ल्याचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. अवघ्या २३ सेकंदात हल्ला करून हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत. या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा सुरू केला.

## सात तलावांमध्ये फक्त ३३ टक्के पाणीसाठा शिल्लक

### मुंबईकरांनो पाणी जपून वापरा



**■मुंबई। प्रतिनिधी :**

मुंबई शहराला पाणीपुरवठा करणा[?]्या सात प्रमुख तलावांतील पाणीसाठा एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. सध्या या सात तलावांमध्ये फक्त ३३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे लवकरच मुंबईकरांवरील पाणी संकटाचे सावट अधिक गडद झाले आहे. मुंबईतील तलावांमधील पाणीपातळी कमी झाल्याने लवकरच पाणी कपातीचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मुंबईकरांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन मुंबई महापालिकेने केले आहे.

**सध्याच्या पाणीसाठ्याची आकडेवारी**

मुंबईकर गेल्या वर्षापासूनच १० ते २० टक्क्यांपर्यंत पाणी कपातीचा सामना करत आहेत. सध्याच्या पाणीसाठ्याची आकडेवारी पाहिल्यास अप्पर वैतरणा जलाशयात ९२ हजार ३५ दशलक्ष लिटर, मोडक सागरमध्ये ३० हजार २६० दशलक्ष लिटर, तानसामध्ये ३८ हजार ६६० दशलक्ष लिटर, मध्य वैतरणामध्ये ७५ हजार ५८५ दशलक्ष लिटर, भातसामध्ये सर्वाधिक २ लाख ३८ हजार ९५९ दशलक्ष लिटर, विहारमध्ये १२ हजार ३९० दशलक्ष लिटर आणि तुळशीमध्ये सर्वात कमी ३ हजार ५५० दशलक्ष लिटर पाणीसाठा उपलब्ध आहे.

**राखीव कोट्यातील पाणीसाठा देण्याची मागणी**

मुंबईतील पाणीसाठ्याची स्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. या गंभीर परिस्थितीत मुंबई महानगरपालिकेने राज्य सरकारच्या अखत्यारीतील वैतरणा आणि भातसा या मोठ्या पाणी प्रकल्पांमधून राखीव कोट्यातील पाणीसाठा देण्याची मागणी केली आहे. महापालिकेने याबाबत मागणी करुन तीन आठवडे उलटले आहेत. तरी राज्य सरकारचा हा निर्णय प्रलंबित ठेवला आहे. त्यामुळे मुंबईतील पाणी संकट अधिक गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच राज्य सरकार यावर कधी निर्णय घेणार आणि तातडीने निर्णय घेणार का? याकडे आता मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

**लवकरच पाणी संकट ओढावणार**

सध्या मुंबईतील धरणांचा पाणीसाठ ३३ टक्क्यांवर आला आहे. कडक उन्हामुळे पाण्याचे बाष्पीभवन होतं आहे. यंदाचा पाऊस लांबला तर मुंबईकरांवर पाण्याचे संकट ओढवणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. पाणी पुरवठा खात्याचा राखीव पाणी वापरासाठी पाठपुरवठा करणे सुरू आहे. मुंबईच्या ७ धरणांमध्ये फक्त पाच लाख सात हजार ४४५ दशलक्ष पाणीसाठा म्हणजेच ३३ टक्के पाणी शिल्लक आहे. त्यामुळे लवकरच पाणी संकट ओढावणार असल्याचे दिसत आहे.

**पाऊस लांबणीवर पडणार**

मुंबईला मोडक सागर, तानसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, तुळशी, विहार आणि भातसा या सात तलावातून दररोज ३८५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील वाढते औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. मुंबईतील तलावातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात आहे. त्यातच हवामानातील बदलांमुळे पाऊस लांबणीवर पडल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे.

## राज्यभरातील पत्नीपीडित पुरुष एकत्र... मेळावाच घेतला

**काय म्हणाले पुरुष...**

मेळाव्यात आलेला एक पुरुष म्हणाला, आमचे लव्हमॅरेज झाले होते. माझी पत्नी चार दिवस राहिली. त्यानंतर ती माहेरी गेली. त्यानंतर त्या मुलीची आई म्हणाली, संपत्ती माझ्या मुलीच्या नावावर कर. मी नकार दिल्यावर माझ्यावर जीवघेणा हल्ला केला. त्यानंतर माझ्यावर छळवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. मेळाव्यात आलेला आणखी एक पुरुष म्हणाला, लग्न झाल्यानंतर माझ्या पत्नीकडून मला मानसिक आणि शारीरीक त्रास देण्यात आला. मला ती इंजिनिअर असल्याचे सांगून लग्न करण्यात आले. परंतु माझी फसवणूक झाली. ती इंजिनिअर नव्हती. उलट ती माझ्याकडे पैशांची मागणी करु लागली. 17 लाख दे, नाहीतर मी तुला आयुष्यभर त्रास देईल, अशी धमकी तिने दिली.




**■बीड। प्रतिनिधी :**

महिलांवर होणारे अत्याचार आणि त्यासंदभार्तील गुन्ह्यांची माहिती मिळत असते. परंतु पुरुषांवर काही महिलांकडून अत्याचार होत असतात. त्या अत्याचारास कंटाळून काही पुरुषांनी जीवनही संपवले आहे. त्यामुळे राज्यात पुरुष हक्क समिती स्थापन करण्याची मागणी होत आहे. आता नाशिकमध्ये एक अनोखा मेळावा पार पडला. नाशिकमध्ये पत्नीपीडित पुरुषांचे संमेलन भरवण्यात आले होते. या संमेलनात पत्नीपीडित पुरुषांनी एकत्र येऊन आपल्या समस्या मांडल्या. आमच्यासाठी कायदा करा, आम्हाला न्याय मिळावा, अशी मागणी यावेळी केली. पत्नीपीडीत पुरुषांच्या मेळाव्याचे हे दुसरे वर्ष होते. या मेळाव्यात महाराष्ट्रातील अनेक पत्नीपीडीत पुरुष उपस्थित झाले होते.

पुरुषाच्या जाचाला कंटाळून पत्नीने आत्महत्या केलेल्या घटना आपण अनेकदा बघतो. मात्र आता पत्नीच्या जाचाला कंटाळलेल्या पुरुषांची संख्या देखील वाढत चालली आहे. याच पत्नीपिडित पुरुषांना मानसिक आधार देण्याचे काम पुरुष स्वाभिमानी फाउंडेशनतर्फे केले जात आहे. त्यांना मानसिक आणि कायदेशीर सल्ला देण्याचे काम देखील मेळाव्यात करण्यात आले. ज्याप्रमाणे महिलांसाठी कठोर कायदा करण्यात आले, त्याचप्रमाणे पुरुषांसाठी देखील कायदा करण्यात येऊन स्वतंत्र पुरुष आयोग बनवावा, अशी मागणी देखील यावेळी पत्नीपीडित पुरुषांनी केली.

**तृप्ती देसाई यांची मागणी**

राज्यात पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. या घटना थांबवण्यासाठी राज्य सरकारने महिला आयोगाच्या धर्तीवर पुरुष हक्क आयोगाची स्थापना करावी, अशी मागणी भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केली आहे.

## पुढील ४८ तास महत्त्वाचे

### जिल्ह्यांसाठी अलर्ट

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राज्यातील बहुतांश भागात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा पाऊस झाला. अवकाळी पावसामुळं अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहेत. पाऊस पडून गेल्यानंतर वातावरण दमट व उष्ण राहणार असा इशारा हवामान विभागाने दिला होता. मात्र तापमानात आता आणखी वाढ होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पुढील ४८ तासांत उत्तर महाराष्ट्रातील काही भागांत कमाल तापमान ४० अंशापेक्षा जास्त नोंदवले जाऊ शकते. पुढील ४८ तासांत उत्तर महाराष्ट्रातील काही भाग कमाल तापमान ४०+ पर्यंत पोहोचू शकतात. वायव्य भागातील अतिरेकी तापमानावर लक्ष ठेवा आणि काळजी घ्या. नंदुरबार, जळगाव, पुणे, धुळे नाशिक आणि आसपासच्या लोकांनी कृपया लक्ष ठेवा, असं होसाळीकर यांनी म्हटलं आहे. दरम्यान, मुंबईचा पारा ३५ वर असला तरी हवामान उष्ण आणि दमटच राहील, असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

## गावकऱ्यांनी थेट ग्रामपंचायत विकायला काढली... कारण विचार करायला लावणारं

**■जालना। प्रतिनिधी :**

जालन्यातील भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव कोलते ग्रामपंचायत ग्रामस्थांवर अक्षरशः गाव विकण्याची वेळ आहे. गावात वेगवेगळ्या ठिकाणी गाव विकण्या संदर्भात बॅनर, पोस्टर सगळीकडे लावले आहेत. ग्रामस्थांनी एवढं टोकाचं पाऊल का उचलावं लागलं अशी चर्चा सगळीकडे होत आहे.

जालन्यातील कोलते ग्रामपंचायत ग्रामस्थासह माजी ग्रामपंचायत सदस्यांनी विक्रीला काढली आहे. गावकऱ्यांनी "पिंपळगाव कोलते ग्रामपंचायत विकणे आहे' अशा आशयाचे पोस्टर गावात लावले आहेत. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

सरपंच, उपसरपंच हे गावात विहीर आणि घरकुल वाटप करतांना भ्रष्टाचार करत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराला वैतागलेल्या गावकऱ्यांनी संपूर्ण गावात ग्रामपंचायत विक्रीला असल्याचे बॅनर सगळीकडे लावले आहेत.




दरम्यान पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यावी अन्यथा ग्रामस्थ सामूहिक आत्मदहन करण्याच्या तयारीत असल्याचा ईशारा माजी उपसरपंचांनी दिला आहे. एवढंच नव्हे पुढे ते म्हणाले की, जर यामध्ये बदल झाला नाही तर गावकरी आत्मदहन करण्याचा इशारा देखील दिला आहे.

**महाराष्ट्रात कुठे घडलाय हा प्रकार?**

या अगोदर राज्यातील बीड जिल्ह्यातील ग्रामस्थांनी गाव विक्रीला काढले होते. बीडमधील पाटोदा तालुक्यातील खडकवाडी गाव विक्रीसाठी काढले होते. या गावात 1800 ग्रामस्थ राहतात. कारण या गावाचा विकास केवळ कागदावरच झाला आहे. ज्या प्रमाणे ह्यजाऊ तिथे खाऊह्ण चित्रपटात विहीर केवळ कागदावरच झाली होती, त्या प्रमाणे गावाचा विकास कागदावर करण्यात आला आहे. विकासासाठी आलेला निधीतून गावातील प्रमुख आणि इतर अधिकाऱ्यांनी आपले खिसे भरल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला होता.

**■धाराशिव। प्रतिनिधी :**

भविष्याचं गोड स्वप्न रंगवत फेअरवेल कार्यक्रमात बोलत होती

## स्टेजवरच तरुणीला मृत्यूनं गाठलं

धाराशिव जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे चांगलीच खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त होत आहे. महाविद्यालयाच्या फेअरवेल कार्यक्रमात बोलत असतानाच एका वीस वर्षीय विद्यार्थिनीची तब्येत अचानक बिघडली. त्यानंतर ती स्टेजवरच कोसळली, या घटनेत तिचा मृत्यू झाला आहे. वर्षा खरात असं या मुलीचं नावं आहे. ही घटना परंडा येथील एका महाविद्यालयात घडली आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, परंडा येथील एका कॉलेजमध्ये फेअरवेलचा कार्यक्रम सुरू होता. या कार्यक्रमामध्ये बोलण्यासाठी वर्षा खरात स्टेजवर गेली. तिचं भाषण सुरू होतं. मात्र त्याचदरम्यान अचानक तिची तब्येत बिघडली. ती स्टेजवरच कोसळली ती बेशुद्ध झाली. या घटनेनंतर तिथे उपस्थित असलेल्या सर्वांनाच मोठा धक्का बसला. सर्वांनी स्टेजकडे धाव घेतली. तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.



मात्र ती शुद्धीवर येत नसल्यानं तिला तातडीनं परंडा येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केलं. समोर आलेल्या माहितीनुसार वर्षा आठ वर्षांची असतानाच तिच्या हृदयाचं ऑपरेशन झालं होतं. मात्र त्यानंतर बारा वर्ष तिला कोणताही प्रॉब्लेम आला नव्हता. तिची तब्येत सामान्य होती. प्रकृतीबाबत कोणतीही तक्रार नव्हती. तिला कोणत्याही प्रकारचे औषधोपचार देखील सुरू नव्हते. परंतु अचानक भाषण सुरू असताना तिची तब्येत बिघडली, ती स्टेजवर कोसळली आणि तिचा मृत्यू झाला.

## सीएसएमटीतील चहावाला महिन्याला कमवायचा दीड लाख, चौकशी करताच मोठा घोटाळा उघड, अधिकाऱ्यांना चहा पाजायचा अन्...




**■नाशिक। प्रतिनिधी :**

रेल्वेचे कन्फर्म तिकीट मिळवण्यासाठी नागरिकांना एकतर खूप वेळ वाट पाहावी लागते किंवा एखाद्या एजंटकडून कन्फर्म तिकीट घ्यावे लागते. त्यासाठी ग्राहकांना जास्त पैसे मोजावे लागतात. मात्र अलीकडेच कन्फर्म तिकीट घोटाळा उघडकीस आला आहे. त्यामुळं एकच खळबळ उडाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर एका चहावाल्याने लाखो रुपयांचा घोटाळा केला आहे. दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी या चहावाल्याचा कारनामा उघड केला असून त्याला ताब्यात घेतलंय.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर चहावाल्याचं दुकान होतं. चहावाला वरिष्ठ अधिकाऱ्यांना चहा पुरवायचा. त्यांच्याशी त्याने ओळख वाढवली. त्यानंतर त्याने याच अधिकाऱ्यांच्या बनावट सही-शिक्क्याचा वापर करुन व्हीआयपी कोट्यातून तिकीट कन्फर्म करून दिली. रविंद्र कुमार साहू असं या चहावाल्याने नाव आहे. या कन्फर्म तिकीट घोटाळ्यातून त्याने महिन्याला तब्बल दीड ते दोन लाख रुपयांची कमाई केली आहे. तिकीटविक्रीतून इतकी कमाई केल्याचे पाहून अधिकारीही आश्चर्यचकित झाले आहेत. या प्रकरणी दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी चहावाल्याला ताब्यात घेतलंय.

रेल्वेची तिकीटं मिळत नसल्याची तक्रार प्रवासी नेहमीच करतात. अशावेळी लोक तिकीट मिळवण्यासाठी एंजटची मदत घेतात. तर काही जण तिकीट मिळावं म्हणून प्रवासी मिळेल तिथून आणि जास्त पैसे मोजून तिकीट खरेदी करतात. याचाच फायदा चहावाल्याने घेतला. साहू हा सीएसएमटी रेल्वे कँटिनमध्ये कार्यरत आहे. वरिष्ठ अधिका[?]यांना चहा देण्याचं काम तो करायचा. त्याने वरिष्ठ विभागीय वित्त व्यवस्थापक, मुख्य वैद्यकीय अधीक्षक आणि मुख्य अभियंता अशा पदांवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे बनावट सही-शिक्का तयार करून घेतले. वेटिंग लिस्टला असलेल्या प्रवाशांचे तिकीट कन्फर्म करण्यासाठी लेटर तयार करून तो त्यावर अधिकाऱ्यांच्या बनावट सही-शिक्क्यांचा वापर करायचा. त्या आधारे तो तिकीट कन्फर्म करुन घ्यायचा.

रेल्वेच्या सुरक्षा दलाना साहूविरोधात कारवाई सुरू केलीय. त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून रेल्वेची फसवणूक केल्याचा आरोप त्याच्यावर दाखल केलाय. मध्य रेल्वेचे मुख्य दक्षता निरीक्षक आणि त्यांचे पथक रेल्वेतील प्रवाशांची तिकिटं तपासत होते. त्यावेळी काही प्रवाशांनी जास्त पैसे देऊन कन्फर्म तिकिट घेतलंय असं सांगितलं. जेव्हा अधिक चौकशी केली तेव्हा रेल्वे कँटिनचा कामगारच व्हीआयपी कोट्यातून तिकीटं विक्रीचा कारभार करत होता असं उघडकीस आलं.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# न्यायाधीशांचा स्तुत्य निर्णय!

सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च न्यायालयातील सर्व न्यायाधीशांची नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत सर्व ३० न्यायाधीशांनी आपापल्या संपत्तीचा तपशील सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राहावा म्हणून हा निर्णय न्यायाधीशांनी घेतल्याचे समजते. यासंदर्भातील कुठलेही अधिकृत पत्रक सर्वोच्च न्यायालयाकडून अद्याप जारी करण्यात आलेले नाही. न्यायव्यवस्था ही भारतीय लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी एक महत्त्वाचा स्तंभ आहे. परंतु मागच्या काही वर्षांमध्ये विधिमंडळ, कार्यपालिका आणि माध्यमांप्रमाणेच न्यायव्यवस्थेच्या स्तंभालाही अविश्वासाच्या वाळवीने पोखरायला सुरूवात केल्याचे दिसून येते. याआधी तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या पुढाकाराने न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टी काढून टाकत तिच्या हातात तलवारीऐवजी संविधान सोपवण्यात आले होते. कायदा हा सर्वद्रष्टा आणि संवैधानिक तत्त्वावर चालणारा आहे. कायद्यापुढे सर्वजण समान आहेत, हे जनतेच्या मनात ठसवण्याचा उद्देश यामागे होता. एका अर्थाने हे खरेही आहे. परंतु केवळ पुतळ्याच्या डोळ्यांवरील पट्टी काढून टाकल्याने लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास एकाएकी वाढला का किंवा या निर्णयाचे साधे प्रतिबिंब तरी न्यायव्यवस्थेत उमटले का? या प्रश्नाचे उत्तर तत्कालीन सरन्यायाधीशच देऊ शकतील. उलट त्यांनी महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या प्रकरणात दिलेला निकाल आणि विधिमंडळ व निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थांनी या निकालाचे आपल्या सोयीने लावलेले अर्थ पाहून घटनातज्ज्ञांना जबर धक्का बसलेला आहे. अद्यापही तत्कालीन सरन्यायाधीशांच्या या निकालावर शंकाकुशंका उपस्थित केल्या जातात. मधल्या काळात अहमदाबाद उच्च न्यायालयाने लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींना वादग्रस्त व्यक्तव्याबद्दल दिलेली २ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा असो किंवा काल परवा अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका प्रकरणात सुनावणी करताना महिलेच्या छातीला हात लावणे किंवा पायजम्याची नाडी सोडणे हा बलात्कार ठरू शकत नाही, असा दिलेला निकाल वादग्रस्त ठरलेला आहे. राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना सरकारी फसवणुकीच्या प्रकरणात जामीन देताना नाशिक जिल्हा न्यायालयाने केलेल्या टिप्पणीवरही आक्षेप घेण्यात आला आहे. कोकाटेंची शिक्षा कायम ठेवल्यास त्यांच्या मतदारसंघात पुन्हा निवडणूक घ्यावी लागेल, हे न्यायालयाने दिलेले कारण अनेकांना पटलेले नाही, याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली आहे. मागच्या काही वर्षांत स्थानिक न्यायालयांपासून ते सर्वोच्च न्यायालयाने दिलेले अनेक निर्णय संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले आहेत. सर्वसामान्यांनी पोलीस ठाण्याची आणि न्यायालयाची पायरी कधीही चढू नये, असा सल्ला कधीकाळी आपले बुजूर्ग देत. भारताच्या स्वातंत्र्याला अनेक दशके उलटूनही परिस्थिती बदललेली नाही. त्यांचा हा सल्ला आजच्या काळातही अगदी तंतोतंत लागू पडतो. हा सल्ला धुडकावून जे लोक नाईलाजास्तव का होईना न्यायाच्या अपेक्षेने त्या वाटेला जातात, त्यांच्या आयुष्यातील मौल्यवान काळ तारीख पे तारीखच्या चक्रात गुरफटून नाहीसा झाल्याशिवाय रहात नाही. कारागृहात १०-१० वर्षे सडल्यानंतर एखाद्या आरोपीची निर्दोष मुक्तता होते, मात्र बाहेर पडेपर्यंत त्याची जगण्याची उमेदच मेलेली असते. या देशात रस्त्यांपासून न्यायालयांपर्यंत सर्वत्र कायद्याचे उल्लंघन होते, पण डोळ्यावरील पट्टी काढून टाकलेली मूर्ती कोणतीही हालचाल करत नाही, कारण केवळ मूर्तीच नाही तर आपली न्यायव्यवस्थाही असंवेदनशील झाली आहे. रस्त्यांवर गुन्हा घडत असताना कायदा प्रेक्षकासारखा उभा असतो, पोलीस ठाण्यांमध्ये तो खंडणी आणि छळाचे हत्यार बनतो आणि न्यायालयीन कचेऱ्यात तो युक्तिवाद आणि तारखांच्या अत्यंत कंटाळवाण्या प्रक्रियेत तुम्हाला पिळवटून टाकतो. एकट्या सर्वोच्च न्यायालयात सुमारे ८० हजार खटल्यांचा ढीग साचला आहे. सर्वोच्च न्यायालयापासून ते देशातील स्थानिक न्यायालयांपर्यंत प्रलंबित खटल्यांची संख्या ५ कोटींच्या वर असल्याचे समजते. देशभरातील तुरुंगात असंख्य अंडर ट्रायल कैदी जामिनाच्या प्रतीक्षेत खितपत पडलेत. न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणे, जामीन हा नियम आणि तुरुंग हा अपवाद, असे सर्वच न्यायाधीश निवृत्त झाल्यानंतर भाषण ठोकताना सांगतात, मग प्रत्यक्ष खुर्चीत बसलेले असताना या तत्त्वाची अंमलबजावणी करण्यात ते फोल का ठरतात? लोकशाही हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जबाबदार असलेल्या संस्थाच त्यांचे सर्वाधिक उल्लंघन करताना दिसत आहेत. कोठडीतील मृत्यू, बनावट चकमकी आणि छळाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मागील काही वर्षांपासून देशात न्यायालयीन स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. परंतु न्यायालये क्वचितच कुठल्या प्रकरणात सुमोटो याचिका दाखल करताना दिसतात. खुद्द सरन्यायाधीशांच्या नियुक्तीवरील वादही अद्याप शमलेला नाही. दिल्ली हायकोर्टाचे न्यायाधीश यशवंत वर्मांच्या निवासस्थानी सापडलेल्या कथित बेहिशेबी नोटांच्या बंडलांमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडेल असे वाटून सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी संपत्ती जाहीर करण्याचा निर्णय घेतला असावा. या स्तुत्य निर्णयाची अंमलबजावणी स्थानिक न्यायालयातही व्हावी. मागच्या काळात स्वेच्छानिवृत्ती घेतलेले अनेक न्यायाधीश राजकीय पक्षांच्या तंबूत शिरलेले दिसले होते. त्यामुळे निवृत्तीनंतर लाभाची पदे नाकारण्याचे धाडसही न्यायाधीशांनी दाखवावे. न्यायव्यवस्थेला खरोखरच जनतेच्या विश्वासास पात्र ठरायचे असेल, तर आधी न्यायालयीन प्रक्रियेत आमूलाग्र बदल व्हायला हवा. न्यायालयांमध्ये गाऱ्हाणे घेऊन येणाऱ्यांना खरोखरच न्याय मिळायला हवा. हा न्यायच विश्वाचा पाया असेल.

# मोदी सरकारला अचानक मुस्लिमांची एवढी काळजी का वाटू लागली?

**ट्रम्प महाशय भारतावर आयात शुल्क वाढवून करबॉम्ब आदळत असताना, वक्फचा कायदा 'उम्मीद' नावाने आणून १२-१२ तास निरर्थक विषयांवर संसदेत चर्चा केली जात आहे.**



'वक्फ'चा अर्थ इस्लाम धर्मियांनी आपल्या संपत्तीतील काही वाटा परमार्थासाठी अल्लाच्या नावाने दान करणे, असा आहे. हे दान रोख किंवा स्थावर-जंगम मालमत्तेच्या स्वरूपात करता येते. पण एकदा का हे दान केले की, मग त्या मालमत्तेवर कोणाचाही वैयक्तिक अधिकार राहत नाही. ती संपूर्ण मालमत्ता धर्मादाय वक्फ मंडळाच्या मालकीची होते. वक्फच्या या लाखो एकर जमिनीवर ईदगाह, दर्गे, मदरसे, मशिदी आहेत. धर्म कोणताही असो, त्यात धर्ममार्तंडांचे हितसंबंध राखण्यासाठी साचलेपण निर्माण झाले आणि संपत्तीनिर्मिती झाली की, धमार्दाय मालमत्तेत गैरव्यवहार होत असतातच. वक्फ मंडळातही असेच गैरव्यवहार झाले आहेत. ते होऊ नयेत म्हणून सरकारने वेळोवेळी कायदेही केलेले आहेत. पण अनेकदा प्रशासन आणि वक्फ मंडळाचे व्यवस्थापक यांच्यात आर्थिक साटेलोटे होते आणि हे गैरव्यवहार लपवले जातात. हे गैरव्यवहार टाळावेत या उदात्त विचाराने वक्फ विधेयक मोदी सरकारने लोकसभेत मांडले आणि मंजूर करून घेतले, असे म्हटले जाते. मग या विधेयकास इस्लाम धार्मियांचा विरोध का? असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. तेव्हा त्यांचे आक्षेप कशाला आहेत हे समजून घ्यायला हवे.

(१) वक्फ मंडळासंबंधीच्या आतापर्यंतच्या कायद्यात अशा गैरव्यवहारात पकडलेल्यांसाठी दोन वर्षांची शिक्षा होती ती आता फक्त सहा महिन्यापर्यंतच करण्यात आलेली आहे. या मागचा हेतू काय? जर गैरव्यवहार टाळायचे असतील तर शिक्षा कडक करायची की कमी करायची?

(२) या कायद्यात वक्फ मंडळामधील व्यवस्थापनात दोन मुस्लिम महिलांचा समावेश करण्याचा अधिकार दिलेला आहे. तसा तर तो आत्तापर्यंत होताच. पण मोदी सरकार म्हणते की, महिला सबलीकरणासाठी हे आवश्यक होते. हे क्षणभरासाठी खरे मानले तरी मग मोदी सरकारने याचे उत्तर द्यावे की, त्यांनी लोकसभा वा विधानसभा निवडणुकीत किती मुस्लीम महिलांना उमेदवारी दिली आणि निवडून आणले? तिथे मुस्लीम महिला सबलीकरण आवश्यक नाही काय?

(३) या नव्या कायद्यात इस्लामेतर व्यक्ती वक्फचे नियमन करू शकतात, असेही म्हटले आहे. हे कलम तर थेट संविधानातील २६ व्या अनुच्छेदाला छेद देणारे आहे. या अनुच्छेदानुसार प्रत्येक धमार्तील धर्मस्थानाचे व्यवस्थापन त्या त्या धमार्तील लोकांना करण्याचा हक्क आहे, असे स्पष्ट म्हटले आहे. ही तर राज्यघटनेची पायमल्ली झाली. मग असाच अधिकार मोदी सरकार हिंदू, ख्रिश्चन, शीख यांच्या धर्मिक स्थळांमध्ये इतर धर्मियांना देण्याचा कायदा का करत नाही? हिंदूंच्या बालाजी वा केदारनाथ अशा कोणत्याही मंदिरांच्या व्यवस्थापनात अन्य धर्मीयांना सहभाग घेऊ दिला जाईल का, याचे उत्तर मोदी आणि शहा देतील काय? मग फक्त मुसलमानांसाठीचा अपवाद का? यावरून मोदी सरकारचे मुसलमानांविषयीचे पक्षपाती धोरण स्पष्ट होते; जे गेल्या दहा वर्षांत झुंडबळी घेणे, बुलडोझर फिरवणे अशा विविध मार्गांनी त्यांनी जाहीरपणे दाखवून दिले आहे.

(४) या कायद्यातील आणखी एक अत्यंत आक्षेपार्ह बाब म्हणजे बिगर मुस्लीम व्यक्तीस वक्फला देणगी देता येणार नाही. असे का? एखाद्या मुस्लिमेतर व्यक्तीस जर वक्फला देणगी द्यावीशी वाटली तर त्यात काय बिघडले? असे कप्पेबंद नियमन करायचे असतील तर हिंदू देवस्थानांनाही गैरहिंदूला देणगी देता येणार नाही असा कायदा मोदी सरकार करणार काय? म्हणजे हिंदूंनी सर्व धर्मियांकडून पैसे घ्यायचे आणि मुसलमानांनी मात्र नाही! हा तर शुद्ध विषमता पोसणारा अपपरभाव झाला. हे अर्थातच विषमतेचे समर्थन करणाऱ्या जात्यांध आणि परधर्मद्वेषी हिंदुत्ववाद्यांना योग्य वाटणे शक्य आहे. पण कोणताही सुबुद्ध माणूस अशा पक्षपातीपणाचे समर्थन करणार नाही.

(५) तसेच या कायद्यानुसार एखाद्याने धर्मांतर केल्यास त्यास वक्फसाठी काही काळ प्रतीक्षा करावी लागेल आणि आपली इस्लामनिष्ठा सिद्ध करावी लागेल. हा तर मोठा विनोदच झाला. हिंदुत्ववादी सरकार कधीतरी हिंदू देवस्थानावर नेमणुका करताना त्या लोकांच्या धर्मनिष्ठा तपासते काय? की ते हिंदू तेवढे धर्मनिष्ठ आणि बाकीचे धर्मच्युत असतात असे सरकार समजते?

थोडक्यात मोदी सरकारला अशा प्रकारचा कायदा करून आपल्या विचाराचे हिंदुत्ववादी वक्फ मंडळाच्या व्यवस्थापनात घुसवायचे आहेत. असे करणे म्हणजे सर्वोच्च न्यायाधीशाच्या नियुक्तीसाठी कॉलोजियम बरखास्त करून केंद्र शासनातील दोन व्यक्तींचा समावेश करत आपल्या मर्जीतील न्यायाधीशाची वर्णी लावता येणे जसे सहज घडू शकते तसेच मुस्लिमेतर दोन व्यक्ती वक्फ व्यवस्थापनात घुसवून ढवळाढवळ करणे सोपे होत वक्फ मंडळाच्या मालमत्ता हडप करता येणे शक्य होईल, अशी मुसलमानांना भीती वाटली तर ते चूक कसे ठरेल? एकंदरीत हा कायदा गरीब मुसलमानांच्या फायद्यासाठी आहे, असे सांगून हे सरकार समस्त मुस्लिमांना दडपणाखाली आणि भीतीच्या छायेखाली आणू इच्छित आहे, असे दिसते. पण मोदी सरकारने या कायद्यात लावलेली ही नवीन कलमे सर्वोच्च न्यायालयात कितपत टिकतील याबद्दल शंका आहे. तेव्हा हा कायदा एवढ्यातच लागू होणे शक्य नाही. कारण मुस्लीम समाज आता सर्वोच्च न्यायालयाची लढाई लढणार आहे आणि ते योग्यच ठरेल.

वक्फचा कायदा 'उम्मीद' नावाने आणण्याची वेळही मोदी सरकारने अशी निवडली आहे की, ज्या वेळेला ट्रम्प महाशय भारतावर आयात शुल्क वाढवून करबॉम्ब आदळत आहेत. ट्रम्प महाशयांच्या या आयात कराच्या बॉम्बफेकीवरून सामान्य जनांचे लक्ष विचलित व्हावे आणि धमार्ची अफूची गोळी खाऊन भारतीय नागरिकांनी गुंगीत रहावे म्हणून बारा-बारा तास वक्फच्या निरर्थक विषयावर संसदेत चर्चा केली जात आहे. अमेरिकेकडून इतके आर्थिक संकट आपल्यावर घाला घालत असतानाही मोदी सरकारला वक्फ कायदा करून आपण काहीतरी क्रांतिकारी गोष्ट केल्याचा अभिनिवेश वाटत असेल तर भारत खरच तिसरी महासत्ता होईल का, असा प्रश्न पडतो. एकंदरीत भारतात वाढणारी बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, वाढती महागाई, शिक्षणातील खेळखंडोबा, घटणारे उद्योग व्यवसाय अशा सगळ्या जीवनमरणाच्या गोष्टींकडे सामान्यजनांचे लक्ष जाऊ नये म्हणून मोदी सरकार हिंदू-मुस्लीम खेळ खेळत भारतीय नागरिकांची दिशाभूल करत आहे, हेच यावरून सिद्ध होते. खेदाची गोष्ट म्हणजे या खेळात बहुसंख्य नागरिकांना यात काही कमीअधिक उणेपण जाणवत नाही. धर्माच्या नशेपुढे पोटाची खळगी भरणे त्यांना दुय्यम वाटते. एकूणच नागरिकांचे असे वागणे त्यांच्या बौद्धिकतेचा स्तर कोणत्या इयत्तेचा आहे हे दाखवते. म्हणूनच या देशात लोकशाही धोक्यात आली आहे याबद्दल सुजाण, सुबुद्ध नागरिक मात्र चिंतेत पडलेला दिसतो.

या सगळ्या पार्श्वभूमीवर गेली १० वर्षे सातत्याने मुस्लीम विरोधी राहिलेले हे सरकार गरीब मुस्लिमांना ह्यसौगात-ए-मोदीह्णची भेट देत आहे, वक्फचा कायदा करत आहे. अशाप्रकारे मोदी सरकारला मुसलमानांच्या प्रेमाचा पुळका आलेला आहे. हे सगळे लवकरच होणाऱ्या उत्तर प्रदेशातील निवडणुकांत हिंदू-मुसलमानांची मते आपल्याकडे वळवण्यासाठी मोदी सरकार करत आहे, ते आपल्या आता लक्षात यायला हरकत नाही. खरे तर हा एका बाजूने गरीब मुस्लिमांना लाभार्थी बनवत दुसऱ्या बाजूने वक्फचा कायदा आणून मुस्लीम धर्मियांना धकधपटशा दाखवत वक्फच्या लाखो एकर जमिनीवर सरकारी ढवळाढवळ करण्यासाठी मोदी सरकारने रचलेला डाव आहे.

# पंतप्रधान आणि प्रज्ञाचक्षू

योगी, ज्ञानी आणि भक्त यांच्यात सूक्ष्म भेद असतो काय? भक्तीच्या नव्या सोळा प्रकारांची मांडणी महाराष्ट्रात झाली याची किती जणांना कल्पना आहे? 'प्रज्ञाचक्षूं'चा जाहीर आठव करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या नागपूर भेटीत या चिकित्सेकडे वळण्याचे संकेत दिले. काहीशा विस्मृतीत जाऊ पाहणाऱ्या एका दृष्टिहीन, ज्ञानपिपासू संताची चर्चा त्यांनी राष्ट्रीय पटलावर नेली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात जाण्याचा शिरस्ता पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी पाळला होता. रेशीमबागेतील स्मृतिमंदिरात आद्य आणि द्वितीय सरसंघचालकांना अभिवादन करणारे नरेंद्र मोदी हे सर्वोच्च सत्तेतील दुसरे संघ प्रचारक ठरले. बारा वर्षांनंतरच्या या भेटीने संघ आणि भाजपामधील अनेक वहीम संपुष्टात आणले. काही लोक चर्चा नव्याने सुरू झाल्या. मोदींच्या निवृत्तीचा मुद्दा त्यापैकीच. नरेंद्र मोदी ज्यासाठी नागपुरात आले, तो सोहळा माधव नेत्रपेढीचा होता. आधीच्या आणि आताच्या संघात बराच बदल आहे. धाटणी सारखी आहे. कृतीचा वेग वाढला आहे. स्वयंसेवकांचा दातृत्वभाव संपलेला नाही. माधव नेत्रपेढीला महाराष्ट्रातील प्रतिष्ठित उद्योजकाने दिलेले योगदान अंदाजे दोनशे कोटींच्या घरात आहे. कटिबद्धता आणि समर्पणाचे हे उदाहरण आहे. माधव नेत्रपेढीने संघाचे द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांच्या स्मृतीत नेत्रोद्दीपक काम केले. सरसंघचालक आणि पंतप्रधान हे दोघेही नागपुरातील 'माधव नेत्रालय प्रीमियम सेंटर'च्या शिलान्यासाला उपस्थित होते. नरेंद्र मोदींच्या भाषणातील संत गुलाबराव महाराजांच्या उल्लेखाने अनेकांना सुखद धक्का दिला. असाधारण परंतु अलक्षित बहुजन अग्निशलाकेवरील राख झटकण्याचे काम त्यातून झाले. गुलाबराव महाराजांचे वाङ्मय सर्व भाषांत नेऊन ऋण फेडण्याची गळ वाजपेयींनीही घातली होती. लोकगीते गात समाजप्रबोधन करणाऱ्या गुलाबराव महाराजांच्या उर्वरित वाङ्मय प्रकाशनाला आता वेग यावा. अमरावती जिल्ह्याच्या छोट्या माधान खेड्यातले ते गुलाब गोंदूजी मोहोड. १८८१ ते १९१५ हा जीवनकाळ. नवव्या महिन्यात अंधत्व आले. चौथ्या वर्षी मातृसुखाला, तर दहाव्या वर्षी ते पितृसुखाला पारखे झाले. उण्यापुऱ्या ३४ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी १३४ ग्रंथ लिहिले. त्यांच्या बोलण्याचा वेग चार जणांना टिपणे जड जायचे. ध्वनिमुद्रणाअभावी त्यांचे अनेक साहित्य हवेत विरले. संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्ताचा समन्वय त्यांनी साधला. शास्त्रीय खंडनमंडणातून भक्तिशास्त्राची नवी मांडणी केली. महाराजांचे अद्वितीय कार्य इतरांना सोडा, वैदर्भीयांनाही पूर्णांशाने ठाऊक नाही. तर्ककठोर होत त्यांनी माधुर्यभक्ती उलगडली. ते स्वतःला 'ज्ञानेश्वर कन्या' संबोधायचे. स्त्रीव्रतांची उपासना करीत कृष्णपत्नी म्हणून वावरायचे. त्यांनी सर्वधर्मसमन्वयाचा सिद्धांत मांडला. डार्विन, स्पेन्सर, ॲनी बेझंट आदी पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांची विचारसमीक्षा केली. संगीत, साहित्य, नाटक, व्याकरण, लिपी, क्रीडा, भक्ती, वेदान्त, सांख्यशास्त्र, छंदशास्त्र, कोश, मानसायुर्वेद अशा विषयांतील सूत्रे त्यांना ज्ञात होती. ११९ पत्रे व समीक्षा, २ हजार ५०० अभंग, २ हजार ५०० पदे, १ हजार २५० गीते, २३ हजार ओव्या, हजारो श्लोक त्यांनी रचले. मराठीखेरीज संस्कृत, हिंदी, ब्रज, वऱ्हाडी आदी भाषा ते बोलायचे. आळंदीला महाराज माहेर समजायचे. माधानच्याच नारायण मोहोड यांनी गुलाबराव महाराज सर्वोदय ट्रस्टद्वारे वाङ्मय भवन उभारून वैदर्भीय पताका आळंदीपर्यंत पोहचविली.

# बुलडोझर बाबांच्या मनमानीवर सर्वोच्च बुलडोझर!

**बुलडोझर कारवाई ही अवैध, असंवैधानिक आणि अमानवीय आहे, अशा शब्दात भाजपशासित राज्यांमधील मुख्यमंत्र्यांच्या आक्रमक कारवायांवर सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझर फिरवला आहे. बुलडोझर सोबतच आणखी एक दुसरा कार्यक्रम काही भाजपशासित राज्यांनी हाती घेतला आहे, तो म्हणजे शहरांची नावे बदलण्याचा. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात काही शहरांची नावे बदलण्यात आली आहेत. त्यानंतर आता उत्तराखंडमध्ये १५ जागांची आणि दोन रस्त्यांची नावे बदलण्यात आली. न्यायालयाकडून केलेल्या कानउघाडणीनंतर याला चाप बसावा अशी अपेक्षा आहे.**

एक एप्रिल हा तसा फूल करण्याचा दिवस, मात्र १ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा जनता, शासन आणि प्रशासन यांना हुशार करणारा राहिला. सर्वोच्च न्यायालयाने एका बुलडोझर कारवाईवरुन उत्तर प्रदेश सरकारला खडे बोल सुनावले आहेत. तसेच अशा घटना पाहून आमच्या सद्सद्विवेकबुद्धीला धक्का लागला असल्याचे न्यायाधीश वृंदानी म्हटले आहे. उत्तर प्रदेशमधील प्रयागराज विकास प्राधिकरणाच्या २०२१ मध्ये झालेल्या बुलडोझर कारवाईला सर्वोच्च न्यायालयाने 'अमानवीय' आणि 'असंवैधानिक' ठरवले.

त्यासोबतच प्राधिकरणाला ज्यांची ज्यांची घरे अनधिकृत म्हणून पाडण्यात आली त्यांना प्रत्येकी १०-१० लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. हे आदेश देताना हेही स्पष्ट केले की यापुढे अशी कारवाई करताना तुमच्या लक्षात राहिले पाहिजे की, आपण करत आहोत ते 'अमानवीय' आणि 'असंवैधानिक' आहे. यातून शासन आणि प्रशासन खरोखर किती धडा घेईल हे येत्या काळात कळेलच. कोर्टाच्या या तार्शेयांची तमा सरकारे किती बाळगतात हे योगी सरकारच्या दोन टर्ममध्ये जनतेने पाहिले आहेच.

न्या. ओक आणि न्या. भुयान यांच्या पीठाने प्रयागराज प्राधिकरणाला जोरदार फटकारले. भारताचे ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी याचिकाकर्त्यांची नुकसानभरपाईची मागणी सपशेल नाकारली होती. मात्र पीडितांना नुकसानभरपाई देणे हाच अधिकाऱ्यांना जबाबदार ठरवण्याचा मार्ग असल्याचे कोर्टाने सुनावले. मात्र सध्या बुलडोझर कारवाईची क्रेज ही सर्वदूर आहे. त्याला सुप्रीम कोर्टाची ही कारवाई आळा घालू शकले का, याबद्दल साशंकताच आहे.

स्वतःची वेगळी छाप निर्माण करण्याच्या उद्देशाने ज्याप्रमाणे बुलडोझर कारवाईची क्रेज मुख्यमंत्र्यांमध्ये निर्माण झाली आहे, तशीच शहरांची नावे बदलण्याची एक पद्धत आता रुढ होताना दिसत आहे. उत्तर प्रदेशातील अलाहाबादचे नाव प्रयागराज करण्यात आले. महाराष्ट्रातील औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव करण्यात आले. भाजपशासित राज्यांच्या या दोन मुख्यमंत्र्यांच्या पाऊलवाटेने चालत उत्तराखंडमधील पुष्करसिंह धामी यांनी राज्यातील १५ जिल्हे आणि दोन मार्गाचे



नाव बदलले आहे.

हरिद्वार, डेहराडून, नैनीताल आणि उधम सिंह नगर या चार जिल्ह्यांमधील ठिकाणांची नावे बदलण्यात आली आहेत. बदललेल्या नावांमध्ये शिवाजी नगर, जोतिबा फुले नगर अशा नावांचा समावेश आहे. उत्तराखंड सरकारने उचललेले हे पाऊल म्हणजे भारतीय संस्कृतीचं संवर्धन करण्यात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या महान व्यक्तिमत्वांचा सन्मान आणि त्यातून जनतेला प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने घेतलेला निर्णय असल्याचे मोठमोठे शब्द वापरण्यात आले आहे.

नावे बदलण्यास हरकत नाही, मात्र या नावे बदलण्यामुळे त्या शहरांचा, गावांचा विकास किती होणार आहे, हा खरा प्रश्न आहे. छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव जिल्ह्यामध्ये आठ ते दहा दिवस नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वाट पहावी लागते. याकडे सरकार किती लक्ष देत आहे? किंबहुना या नाव बदलण्याच्या आड सरकारे आपले अपयश तर झाकत नाही ना, याचाही विचार जनतेने करण्याची गरज आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सुरू केलेल्या बुलडोझर कारवाईला फक्त कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने पाहण्याची चूक होता कामा नये. ज्या राज्यामध्ये भाजपचे सरकार आहे, तिथे तिथे आता बुलडोझर कारवाईला एक धार्मिक पार्श्वभूमीदेखील मिळत आहे. भगव्या कपड्यातील योगी आदित्यनाथ हे स्वतःला कट्टर हिंदुत्ववादी सिद्ध करण्याच्या चढाओढीत सर्वात पुढे आहेत. भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये सर्वाधिक कट्टर हिंदुत्ववादी कोण, अशी जणू अदृश्य स्पर्धा लागली आहे. जशी ही स्पर्धा मुख्यमंत्र्यांमध्ये आहे, तशीच ती मंत्री आणि आमदारांमध्येदेखील आहे.

योगी आदित्यनाथ यांना आता 'बुलडोझर बाबा' ही उपाधीच मिळाली आहे. २०२२ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांची ओळख 'बुलडोझर बाबा' अशी झाली. बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश (बिमारु) या राज्यांमध्ये गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात आहे. गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी त्यांनी गुन्हेगारांच्या घरादारावर बुलडोझर फिरवण्यास सुरुवात केली.

पोलिसी कारवाईसोबत बुलडोझर हे आणखी एक टूल त्यांनी गुन्हेगारांविरोधात वापरण्यास सुरुवात केली. हा प्रयोग जनतेलाही कदाचित आवडायला लागला. कारण जनता ही कायम एका सुपरहिरोच्या प्रतीक्षेत असते. उत्तर प्रदेशात तीन दशकानंतर २०२२ मध्ये जनतेने पुन्हा एकदा भाजप पयार्याने योगी आदित्यनाथ यांच्याकडे सत्तेची सूत्रे सोपवली. जनतेला हा तडकाफडकी न्यायच पसंत आहे, असा भ्रम एकूणच भाजपशासित राज्यात यामुळे कदाचित निर्माण झाला.

बुलडोझर बाबाची क्रेज आणि फेमचं वारं जवळच्या मध्य प्रदेश सरकारलाही लागले. तत्कालीन मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनीही अवैध धंदे आणि अतिक्रमणासाठी बुलडोझर टूलचा वापर करण्यास सुरुवात केली. मात्र बुलडोझर कारवाईने आपण कर्तव्यदक्ष असण्याचे जनतेला आणि पक्षातील श्रेष्ठींना दाखवण्याची जणू अहमहमिका भाजपशासित राज्यांमध्ये निर्माण झाली.

मात्र ज्या पद्धतीने शिवराजसिंह चौहान यांनी पूर्ण बहुमताचे सरकार आणूनदेखील त्यांना मुख्यमंत्रीपद नाकारण्यात आले. त्यांची वर्णी केंद्रात लागली. यातून इतर नेत्यांनी अजून बोध घेतलेला दिसत नाही. योगी आदित्यनाथांच्या कारवाईनंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना फटकारले आणि त्यानंतर या कारवाईचे प्रमाण काहीसे कमी झाले, मात्र अतिक्रमणाच्या नावाखाली बुलडोझर चालवणे काही अजून थांबलेले नाही. त्यामुळे आता न्यायालयालाच या प्रकारांमध्ये अधिक लक्ष घालून आपल्या आदेशाचे पालन होत आहे की नाही हे पहावे लागेल.


नुकत्याच महाराष्ट्रात झालेल्या नागपूर हिंसाचारातील आरोपीच्या घरावरदेखील बुलडोझर चालवण्यात आला. आरोपीला दंगलीच्या गुन्ह्यात पकडल्याबरोबर त्याचे घर हे अतिक्रमित आहे, याचा साक्षात्कार यंत्रणेला कसा होतो, हा सवाल यामुळे निर्माण झाला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या घरावर बुलडोझर चालवला गेला ते घर पकडण्यात आलेल्या आरोपीच्या नावावरदेखील नाही, ते त्याच्या आईच्या नावावर होते. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने केलेल्या गुन्ह्यासाठी संपूर्ण कुटुंबाला शिक्षा देण्याची ही नवी पद्धत अमानवीय असल्याचे अखेर सर्वोच्च न्यायालयाला सांगावे लागले.

बीड जिल्ह्यातील खोक्या उर्फ सतीश भोसले या मागास समाजाच्या भाजप कार्यकर्त्याला मारहाणीच्या खटल्यात अटक करण्यात आली. बीडमधील भाजपचे आमदार सुरेश धस यांचा निकटवर्तीय खोक्याच्या घरावर मागील महिन्यात बुलडोझर फिरवण्यात आला. जर त्याचे घर आणि तिथे थाटलेले भाजप कार्यालय हे वन जमिनीवर होते तर एवढी वर्षे ते कसे काय होते, असा प्रश्न कोणालाही का पडला नाही.

खोक्याला अटक झाल्यानंतरच त्याचे घर हे अतिक्रमण आहे आणि आठ दिवस आधी नोटीस देऊन त्याचे उत्तरही न मिळता बुलडोझर चालवण्याची जी घाई सध्या प्रशासनाला आणि शासनाला झाली आहे. यातून न्याय दिल्याचा आभास निर्माण केला जात आहे. झटपट न्यायाची ही संकल्पना महाराष्ट्राला बिमारु राज्यांच्या पंक्तीत नेऊन बसवणारी आहे. अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणातही कोर्टाने महाराष्ट्र सरकारला फटकारले. या प्रकरणातही झटपट न्यायाचाच सोस सरकारला असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र हे पुरोगामी आणि प्रगत राज्यांच्या यादीत आहे. महाराष्ट्राची तुलना करायचीच असेल तर तामिळनाडू, केरळ, कर्नाटक यासारख्या प्रगत राज्यांसोबत झाली पाहिजे. कालच्याच एका सभेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'महाराष्ट्रात एकही पुढारी असा नाही ज्याच्या पायावर डोके ठेवावे,' असे विधान केले. महाराष्ट्राची परंपरा ही यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण यासारख्या दूरदृष्टी असलेल्या नेत्यांची राहिलेली आहे. त्यांना गुरुस्थानी ठेवून महाराष्ट्राची वाटचाल झाली पाहिजे, ही सत्तेतीलच एका महत्त्वाच्या मंत्र्यांची अपेक्षा असेल तर त्यांच्या सहकारी मंत्र्यांनीही त्यांचा कित्ता गिरवायला हरकत नाही.

# मशरुम्सची भाजी



**साहित्य** : मशरुम - २०० ग्रॅम, कांदा - १ मध्यम आकाराचा, तिखट - १ चमचा, हळद - १/२ चमचा, मीठ - चवीनुसार, जिरे - १ छोटा चमचा, तेल - फोडणीसाठी, आले-लसूण पेस्ट - १ छोटा चमचा, थोडी कोथिंबीर.

**पाककृती :** कांदा, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. मशरुम्स उभे पातळ कापून घ्या. फोडणीसाठी तेल गरम करून जिरे, आले-लसूण पेस्ट, कांदा घालून परतून घ्या. कांदा थोडा शिजल्यावर मशरुम्स घालून परतून घ्या. नंतर हळद आणि तिखट घाला. झाकण ठेवून २ मि. शिजू द्या. या वेळात मशरुम्सना पाणी सुटेल, मग मीठ व कोथिंबीर घालून, गॅस मध्यम आचेवर ठेवून हे पाणी आटेपर्यंत शिजू द्या.

# चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

**चेहऱ्यावरचा एखादा तीळ ब्यूटीमार्क असू शकतो. परंतु, चेहऱ्यावर अधिक तीळ असल्यास किंवा त्यांची जागा चुकीची असल्यास ते खटकतात. शरीरावरील तीळ काढून टाकण्यासाठी काही डर्मेटोलॉजिक ट्रीटमेंट आहेत, परंतु घरगुती उपायांनीदेखील तीळ हटवले जाऊ शकतात, हे तुम्हाला ठाऊक आहे का?**



- कपभर अननसाचा रस आणि पाव कप सैंधव मीठ एकत्र करा. या मिश्रणाने स्क्रब केल्यास चेहऱ्यावरील तीळ कमी होण्यास मदत होईल.
- लसणाची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी तिळावर लावा. त्यावर बॅण्डेज लावा. सकाळी उठल्यावर त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा प्रयोग नियमित केल्यास तिळाचा त्रास कमी होण्यास मदत होईल.
- काही आल्याचे तुकडे ठेचून तिळाच्या जागी लावा. त्यावर कपडा बांधून झोपा. या उपायानेही तीळ कमी होण्यास मदत होते.
- कोथिंबीरच्या काही पानांची पेस्ट करा. ही पेस्ट काही दिवस तुम्हांला नको असलेल्या तिळावर नियमित लावा.
- एरंडेल तेलाच्या मॉलिशमुळेदेखील तिळापासून सुटका मिळू शकते. हळूहळू तीळ कमी होण्यास सुरूवात होईल.
- मध आणि सूर्यफूलाच्या बीयांच्या तेलाचे मिश्रण करा. या मिश्रणाचा तीळावर पाच मिनिटं मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदार होईल सोबतच तिळ कमी होण्यास मदत होईल.
- व्हिटॅमिन सीची एक गोळी बारीक कुटा. रात्री ही पेस्ट तिळावर लावून, त्यावर बॅण्डेज लावून झोपा.
- व्हिनेगरचा वापर करूनदेखील तीळ हटवला जाऊ शकतो. सुरुवातीला चेहरा गरम पाण्याने धुवा. कापसाच्या बोळ्याने व्हिनेगर तिळावर लावा. १० मिनिटांनंतर चेहरा गरम पाण्याने स्वच्छ धुवावा.



# मधुमेह आणि फळे

**मधुमेह हा आजार असलेल्या व्यक्तींनी आहाराबाबत सजग राहणे आवश्यक असते. फळांचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे , अन्यथा या फळांच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की फळांमध्ये नैसर्गिक साखर असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. फळे सेवन केलेली चालतात, असे मानून मधुमेहाचे रुग्ण फळांचे सेवन करतात. पण फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर हानीकारक ठरू शकते.**



**चेरी :** चेरीमध्ये खूप जास्त साखर असते, त्यामुळेच आईस्क्रीम आदी गोष्टी तयार करण्यासाठी चेरीचा वापर केला जातो. एका चेरीमध्ये सुमारे ८ ग्रॅम साखर असते, त्यामुळे चेरीचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे आणि विशिष्ट प्रमाणातच चेरीचे सेवन केले पाहिजे. चेरीच्या सेवनाने रक्तातील शर्करेची पातळी वाढू शकते.

**आंबा :** आंबा हा वर्षातून एकदाच मिळणाऱ्या फळांपैकी एक आहे आणि बहुतेकांना आंबा खूप आवडतो. परंतु त्यातही नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी आंब्याचे सेवन करणे शक्यतो टाळले पाहिजे. सर्वसाधारणपणे एका आंब्यामध्ये ४५ ग्रॅम इतकी नैसर्गिक साखर असते.

**द्राक्षे :** रक्तातील साखरेची पातळी योग्य राखायची असेल, तर द्राक्षांचे सेवन करणे टाळावे. कारण द्राक्षही गोड असतात. एक कप द्राक्षांतून शरीरात २३ ग्रॅम साखर जाऊ शकते.

**लिची :** हे फळही जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या फळांपैकी एक आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. एक कप लिची फळांमध्ये २९ ग्रॅम एवढी नैसर्गिक साखर असते.

**डाळिंब :** डाळिंब रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते, परंतु त्यातही साखरेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे सेवन केल्यास मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. एका साधारण आकाराच्या डाळिंबामध्ये ३९ ग्रॅमपर्यंत साखर असते. मधुमेही रुग्णांनी डाळिंबाचे सेवन टाळले पाहिजे.

मधुमेही रुग्णांनी वरील फळे टाळावी तसेच कोणतेही इतर फळ सेवन करताना विशिष्ट प्रमाणातच सेवन करावे, जेणेकरून रक्तशर्करेचे प्रमाण योग्य राहील. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखर कमी होऊ द्यायची नसते, तशीच ती वाढूनही उपयोग नाही, त्यामुळे ठरावीक वेळेला आहार सेवन करतानाही तो योग्य प्रमाणात सेवन केला पाहिजे.

# व्यायामानंतर खाज येत असल्यास...

**खाज** येण्याच्या समस्येला प्रुराईटस देखील म्हटले जाते. व्यायामादरम्यान खाज आल्याने त्वचेच्या पेशींना त्रास होतो किंवा इरिटेशन होते. सर्वसाधारणपणे अचानक तापमानात झालेले बदल, संसर्ग किंवा सौंदर्यप्रसाधनांची प्रतिक्रिया यामुळे हे होते. काही व्यक्तींमध्ये प्रतिकारशक्ती कमजोर असल्यास ही लक्षणे दिसतात. अशाच प्रकारे जेव्हा आपण वेगात चालतो तेव्हा किंवा थंड जागेवरून गरम जागी जातो आणि थोडे श्रम करतो, तेव्हा खाज येऊ शकते. शरीरातील नसांमध्ये प्रुरिसेप्टर्स असतात. जेव्हा वातावरणात अचानक बदल होतो किंवा त्वचेवर कोणतीही रासायनिक प्रतिक्रिया दिसते, तेव्हा हे प्रुरिसेप्टर्स कार्यान्वित होतात आणि मेंदू आणि मणका यांना संकेत पाठवतात. त्या संकेतांऐवजी मेंदू शरीरात अशा प्रकारच्या रसायनांची निर्मिती सुरू करतो जी या शारीरिक अवस्थेशी निपटण्यासाठी आवश्यक असते. शरीराची ही प्रतिक्रिया समजण्यासाठीच खाज येण्याची समस्या सुरू होते. शरीरांतर्गत रसायनांमुळेही पित्ताची समस्या निर्माण होते.

**खाज कशी दूर करावी?**

- व्यायामादरम्यान किंवा वेगाने चालताना किंवा अतिश्रम केल्यास शरीराला खाज येत असल्यास व्यायाम आणि श्रमाचे काम ताबडतोब थांबवा. एखाद्या उष्ण जागी असाल तर थंड जागी जाऊन थांबा. अशा परिस्थितीत हिवाळ्यापासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घातले असतील तर तेही काढून टाका आणि शरीराचे तापमान सर्वसामान्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. सतत खाज येत असेल तर वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा.
- थंडीमुळे होणाऱ्या पित्ताने वैतागला असाल तर थंड पाण्याचा शेक घ्या. त्यामुळे रक्तवाहिन्या संकुचित होतात आणि हिस्टामिन या रसायनांचे अतिरिक्त वहन थांबवण्यास मदत करते. त्याचबरोबर पित्तामध्ये खाज येत असेल तर त्यावर उपाय म्हणून अर्धा कप दलिया पाण्याच्या टबात टाकून त्याने स्नान करावे.
- याखेरीज एका वाटीत २ चमचे बेकिंग सोडा घ्यावा आणि त्यात पुरेसे पाणी मिसळावे. ही पेस्ट करून खाज येणाऱ्या जागी लावावी तसेच जिथे पित्त उठले आहे त्यावरही लावावे.



# व्हॉट्सअॅप स्टेट्समध्ये शेअर करा एचडी फोटो आणि व्हिडीओ! आलं नवीन फीचर

**व्हॉट्सअॅपने एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला आहे. आता व्हॉट्सअॅप फोटो आणि व्हिडीओ स्टेट्समध्ये देखील क्वालिटी न बिघडवता शेअर करता येईल. हे फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ मध्ये उपलब्ध आहे.**

व्हॉट्सअॅपने अलीकडेच हाय डेफिनिशन म्हणजे एचडी क्वालिटीमध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला होता. त्यानंतर आता व्हॉट्सअॅप एक नवीन अपडेटमधून एचडी फोटो व्हिडीओ स्टेट्स अपडेट करण्याचा ऑप्शन देत आहे. म्हणजे तुम्ही एचडी फॉर्मेटमध्ये फोटो आणि व्हिडीओ आपल्या व्हॉट्सअॅप स्टेट्सवर शेअर करू शकाल. सध्या स्टेट्समध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर त्याची क्वालिटी खराब होते. परंतु आता व्हॉट्सअॅप फोटो व्हिडीओ शेअर केल्यावर त्यांची क्वालिटी खराब होणार नाही.



**बीटा टेस्टरसाठी लाइव्ह झालं फीचर**

नवीन एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ साठी सादर करण्यात आलं आहे. यात जेव्हा तुम्ही व्हॉट्सअॅप स्टेट्स शेअर कराल, तेव्हा तुम्हाला एचडी आयकॉन दिसेल, ज्याच्या मदतीने एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेट्स शेअर करता येतील. व्हॉट्सअॅपच्या एचडी स्टेट्सची सुविधा बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. सध्या याचा वापर बीटा टेस्टर करू शकतात. परंतु लवकरच हे फीचर सामान्य युजर्ससाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

**कसं वापरायचं एचडी फोटो-व्हिडीओ शेअरिंग फीचर**

- सर्वप्रथम तुम्हाला व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करावं लागेल. गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करता येतं.
- यासाठी प्ले स्टोअरवर व्हॉट्सअॅप पेज स्क्रोल डाऊन करा. त्यानंतर बीटा टेस्टर सेक्शनमध्ये जा.
- पुढे जॉईन ऑप्शनवर क्लिक करा.
- बीटा टेस्टरनंतर अपडेट आणि त्याची उपलब्धता चेक करा.
- त्यानंतर व्हॉट्सअॅप अपडेट करून ओपन करा.
- अपडेट झाल्यावर नेहमीप्रमाणे तुमचे फोटोज किंवा व्हिडीओ स्टेट्सला शेअर करा आणि शेअर करताना 'एचडी' ऑप्शन निवडा.

**नोट - जर तुम्ही बीटा टेस्टर नसाल तर सध्या तुम्हाला एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेटस शेअरिंग ऑप्शनसाठी थोडी वाट पाहावी लागेल. जेव्हा हे फीचर लाइव्ह होईल, तेव्हा तुमच्या व्हॉट्सअॅपमध्ये उपलब्ध होईल. यासाठी सिम्पल व्हॉट्सअॅप अपडेट करावं लागेल, म्हणजे तेव्हा बीटा टेस्टर बनण्याची गरज नसेल.**

# शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

**योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.**



**नारळपाणी**

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

**मोसंबी आणि पुदिना**

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

**ब्लॅक चेरी आणि चेरी**

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

**खिऱ्याचे सूप**

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

**सेबचा सिरका**

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

**अननसाचा ज्यूस**

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

# नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

**सकाळच्या** नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.



# अनशापोटी करा गुळाचे सेवन

**अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.**

**रक्तदाब नियंत्रणात राहातो :** रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.




**रक्त साफ होते :** सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

**शरीराला मिळते ताकद :** गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.


**पचनसंस्था मजबूत होते :** ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

# 'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!



**घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.**

**हेअर कलर :** बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.



**हेअरकट :** हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.

**लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय :** लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

**अतिरिक्त व्यायाम :** लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

**फास्ट फूड खाणे :** लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

# घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

**ऋतू** बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..



१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

# बॅनर नियंत्रणावरून पालिकेचे स्व-कौतुक
## शहरभर बेकायदा बॅनर मात्र जैसे थे

**■अंबरनाथ :** उच्च न्यायालयातील एका खटल्याचा संदर्भ देत अंबरनाथ नगरपालिका प्रशासनाने बेकायदा बॅनरबाजीला लगाम लावल्याचे सांगत स्वतःची पाठ थोपटून घेतली असताना दुसरीकडे शहरातील बेकायदा बॅनरवर कारवाई करण्याची मागणी हिराली फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. विशेष म्हणजे एकीकडे पालिका प्रशासन माध्यमांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे कौतुक झाल्याचे सांगत असताना शहरात मात्र बेकायदा फलक झळकत होते.

स्वस्त असलेल्या बॅनर निर्मितीमुळे गेल्या काही वर्षात बॅनर झळकावणे फोफावले आहे. कोणीही व्यक्ती कोणत्याही व्यक्तिला बॅनरद्वारे शुभेच्छा देत असल्याचे दिसून येते. अंबरनासारख्या शहरात उल्हासनगर शहरातली स्वस्त बॅनरची बाजारपेठ असल्याने या शहरांमध्येही बेकायदा बॅनरबाजी वाढल्याचे दिसून आले होते. त्यावर काही दिवसांपूर्वी अंबरनाथ नगरपालिकेने नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांना अशा बॅनरची तक्रार करण्याचे आवाहन दिले होते. मात्र यात तक्रारदाराचे नावही गोपनीय ठेवले जात नसल्याने याकडे नागरिकांनी पाठ फिरवली. परिणामी शहरात बेकायदा बॅनरबाजी उघडपणे सुरू होती.

मधल्या काळात अंबरनाथ नगरपालिकेने अधिकृत बॅनरवर क्यु आर कोड लावण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे ज्यावर क्युआर कोड नाही ते बॅनर बेकायदा असल्याने त्यावर कारवाईचा मार्ग मोकळा होता. असे असले तरी सध्या शहरभर मोठ्या प्रमाणावर बेकायदा बॅनर लावले जात असल्याची बाब हिराली फाऊंडेशनच्या माध्यमातून उघडकीस आणण्यात आली आहे. हिराली फाऊंडेशनच्या सरिता खानचंदानी यांनी याबाबत अंबरनाथ नगरपालिकेला मेलद्वारे तक्रार दिल्याची माहिती दिली आहे. शहरातील बेकायदा बॅनरबाबत यापूर्वीही तक्रारी केल्या होत्या. मात्र त्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही अशी माहिती सरिता खानचंदानी यांनी दिली आहे.

एकीकडे शहरात बेकायदा बॅनर ओसांडून वाहत असताना अंबरनाथ नगरपालिकेने दोन दिवसांपूर्वी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आपले बेकायदा बॅनरबाजीवर नियंत्रण ठेवल्याने कौतुक झाल्याचे सांगितले आहे. हे पत्रक जाहीर होत असताना शहरात पालिकेचे कर्मचारी धावपळीत बेकायदा बॅनर काढत होते. सध्या शहरात ५० हून अधिक ठिकाणी बॅनर असल्याचे पालिकेने मान्य केले आहे. मात्र मनुष्यबळ नसल्याने त्यावर कारवाई करण्यात अडचणी येत असल्याची बाबही पालिका कर्मचारी खासगीत सांगत आहेत.

**प्रदुषण वाढते आहे**

शहरातील बेकायदा बॅनरबाजीमुळे प्रदुषणाचा मुद्दाही गंभीर होत चालला आहे, अशी बाब हिराली फाऊंडेशनने समोर आणली आहे. या बॅनरचे विघटन करण्यासाठी कोणतीही यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे हे बॅनर जाळले जातात किंवा फेकले जातात. त्यामुळे याचे प्रदुषण वाढले असल्याचे दिसून आले आहे. शहरात फक्त विद्रुपीकरण होत नाही तर दुहेरी प्रदुषणही होत आहे. त्यातून अधिक प्रदुषण होत असल्याचे सरिता खानचंदानी यांनी सांगितले आहे.



# नवजात बालके खरेदी-विक्रीचे बिंग उघड
## बदलापुरातील धक्कादायक प्रकार, एक अटकेत



**■बदलापूर :** बदलापुरात नवजात बालकांची खरेदी-विक्री व्यवहाराचे बिंग फुटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका २४ वर्षीय व्यक्तीला अटक केली. अंबरनाथच्या फॉरेस्ट नाका परिसरात वनविभागाचे कार्यालय आहे.

येथील वनक्षेत्रात कलिंगड विक्रेता कचरा टाकत होता. त्याला रोखणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर कलिंगड विक्रेत्याने कर्मचाऱ्यांवर आरोप केले होते. त्यामुळे चित्रफितीची शहानिशा करण्यासाठी वन अधिकारी वैभव वाळिंबे यांनी संबंधित विक्रेत्याला कार्यालयात बोलावले. त्यावेळी संबंधित चित्रफीत किती जणांना प्रसारित केली याची माहिती घेण्यासाठी वाळिंबे यांनी संबंधित विक्रेत्याचा मोबाइल तपासला. त्यावेळी त्याच्या व्हॉट्सअपमध्ये काही संशयास्पद संवाद वाचायला मिळाले. यामध्ये लहान नवजात बालकांचे काही छायाचित्र आणि त्यावर किमती लिहिण्यात आल्या होत्या. हे सर्व संशयास्पद वाटल्याने याबाबत बदलापूर पोलिसांकडे तक्रार दिली, अशी माहिती वाळिंबे यांनी दिली. या प्रकारानंतर बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल थोरवे यांनी गुन्हा दाखल करत बदलापूर पश्चिम येथील वालीवली येथे राहणाऱ्या तुषार साळवे (२४) याला अटक केली. त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपी तुषार साळवे हा अशाच एका प्रकरणात नुकताच जामिनावर सुटून आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**५ ते ७ लाखांचा दर?**

व्हॉट्सअॅपवरील संदेशात नवजात बालकांचे छायाचित्र आणि त्यावर दर लिहिला जात होता. पाच लाखांपासून सात लाखांपर्यंत दर बालकांच्या विक्रीसाठी मागणी केली जात होती, अशी माहिती वनविभागातील सूत्रांनी दिली.

# ठाण्यात शिक्षण विभागाच्या परिपत्रकामुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण

**■ठाणे :** राज्य सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार शाळांच्या वेळापत्रकात मोठा बदल करण्यात आला आहे. शिक्षण विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, शाळांमध्ये मार्च ऐवजी एप्रिल महिन्यात परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या अनपेक्षित बदलामुळे अनेक शाळांना त्यांच्या पूर्वनियोजित वेळापत्रकात सुधारणा करावी लागली, ज्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात परिक्षा संपणार म्हणून पालकांनी सुट्टीचे नियोजन केले होते. परंतू, ऐनवेळी परीक्षेच्या वेळापत्रकात करण्यात आलेल्या बदलामुळे पालकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिली ते नववी वर्गाच्या परीक्षा साधारणपणे मार्च अखेरीस किंवा एप्रिल महिन्यामध्ये शाळास्तरावरुन घेण्यात येतात. यामध्ये प्रत्येक शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे दिसून येते. त्यात, एप्रिल महिन्याच्या सुरुवातीस वार्षिक परिक्षा पूर्ण झाल्यास त्यानंतरच्या कालावधीत शाळा सुरु असल्या तरी, विद्यार्थ्यांची पुरेशी उपस्थिती नसल्याचे दिसते. त्यामुळे राज्यातील सर्व शाळांमध्ये एकवाक्यता असावी उपलब्ध वेळेचा पुरेपुर उपयोग विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी व्हावा याकरिता राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे मार्फत सर्व जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते नववी वर्गाच्या वार्षिक परिक्षा आणि नियतकालीक मूल्यांकन २०२४-२५ साठी वेळापत्रक सादर केले आहे. शिक्षण विभागाकडून आलेल्या वेळापत्रकानुसार परिक्षेचे नियोजन करण्याचे आदेश सर्व शाळांना देण्यात आले. हे परिपत्रक येण्यापूर्वी शाळांनी परीक्षा वेळापत्रक निश्चित केले होते. त्यानुसार, पालकांनी देखील सुट्टीचे नियोजन केले होते. परंतू, अचानक शाळेकडून पुन्हा वेळापत्रकात बदल करण्यात आला असून परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. यामुळे पालकांचे सुट्टीचे नियोजन बिघडले आहे. या निर्णयामुळे अनेक पालक नाराज असून, संतप्त प्रतिक्रिया त्यांच्याकडून व्यक्त होत आहेत.




**पालक प्रतिक्रिया**

नवी मुंबई येथील ऐरोली परिसरात असलेल्या एका खासगी शाळेत सुरुवातीला २४ मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत परिक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात आले होते. ६ एप्रिल पासून शाळेला सुट्टी मिळणार होती. परंतू, अचानक शाळेकडून सर्व पालकांना व्हॉटस अप ॲप द्वारे संदेश पाठविण्यात आले की, सरकारच्या परिपत्रकानुसार शालेय परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. लेखी परीक्षा २९ मार्च ते १५ एप्रिल या कालवधीत परीक्षा घेतली जाणार असून त्यानंतर, १६ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधील नेहमीप्रमाणे वर्ग चालू राहतील. ६ एप्रिल ला परिक्षा संपणार म्हणून आम्ही गावाला जायचे नियोजन केले होते. त्यासाठी गाडीची आगाऊ नोंद केली होती. शाळेच्या वेळापत्रकात झालेल्या या बदलामुळे आमचे नियोजन पूर्णपणे बिघडले आहे, अशी प्रतिक्रिया या शाळेतील एका विद्यार्थ्याच्या पालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर दिली. तर, शिक्षण विभागाने घेतलेल्या या निर्णयाची पूर्व सूचना पालकांना दोन ते तीन महिन्यापूर्वी देणे गरजेचे होते. ऐन वेळी झालेल्या वेळापत्रकातील बदलामुळे सुट्टीचे नियोजन बिघडलेच त्यासह, पालकांना आर्थिक नुकसान देखील सहन करावे लागले, अशी प्रतिक्रिया ठाण्यातील एका शाळेतील विद्यार्थ्याच्या पालकाने दिली.

# आतकोली कचराभुमीच्या संरक्षक भिंतीलगत बांबूच्या वनाची उभारणी : ठाणे महापालिका आयुक्त

**हरीत बेटे तयार करा**

आतकोली कचराभूमीच्या पूर्ण परिघावर बांबूचे बन तयार करण्यात येणार आहे. त्याच जोडीला या पावसाळ्यात कचराभूमीत ठिकठिकाणी हरित बेटे तयार करावीत. त्याचा योग्य अभ्यास करून कार्यवाही करावी, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. तसेच, प्रवेशद्वार, स्थानिक कार्यालय या परिसरातही हरित पट्टा तयार करावा. येथील कचऱ्याचे पूर्ण गांभीयार्ने व्यवस्थापन केले जात आहे, हे जाणवले पाहिजे. त्यामुळेच, कचरा टाकला की त्यावर मातीचा थर द्यावा. दुर्गंधीनाशक आणि जंतूनाशक रसायनाची प्रभावीपणे फवारणी करावी. तसेच, कचरा आणि मातीचा विशिष्ट थर तयार झाल्यावर तेथे वृक्षारोपण करावे. या सर्व गोष्टी कटाक्षाने कराव्यात, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

**■ठाणे :** ठाणे महापालिकेच्या भिवंडी येथील आतकोली भागातील कचराभुमीच्या संरक्षक भिंतीलगत बांबूचे वन आणि मध्यभागी विविध ठिकाणी हरित बेटे तयार करण्यात येणार आहेत. यासंबंधीची घोषणा ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी बुधवारी केली आहे. यामुळे कचराभुमी परिसराचा पर्यावरणपूरक विकास होणार असल्याचा दावा करत स्थानिक नागरिकांना दुर्गंधी तसेच कचरा वाहतुकीचा त्रास होणार नाही याची दक्षता काटेकोरपणे घेण्याच्याही सूचना त्यांनी दिल्या आहेत.



ठाणे महापालिकेकडे स्वतःची कचराभुमी नव्हती. यामुळे शहरात कचरा समस्या निर्माण होत आहे. ही समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी राज्य शासनाने ठाणे महापालिकेला भिवंडी येथील आतकोली भागात कचराभुमीसाठी ३४ हेक्टर इतकी जागा दिली आहे. याठिकाणी पालिकेकडून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प उभारला जाणार आहे. या जागेवर ठाणे महापालिकेतर्फे घनकचऱ्याचे व्यवस्थापन केले जात आहे. या जागेवर गौण खनिजाचे उत्खनन झालेले असून आता या जागेचा विकास महापालिकेमार्फत होत आहे.

या कचराभुमीच्या परिसरातील पायाभूत सुविधांचा विकास, संरक्षक भिंत, सुरक्षा कक्ष, पोहोच रस्ता, २२ एकरचे सपाटीकरण, बांबूचे वन या कामांसाठी राज्य शासनाने ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. हे काम महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. संपूर्ण भूखंडाला चार किंमीची संरक्षक भिंत, त्याला लागून अडीच मीटर अंतराचे बांबूचे बन, कचरा वर्गीकरण प्रकल्पासाठी १२ एकर आणि ग्रॅस निर्मितीसाठी १० एकर अशा एकूण २२ एकर जागेचे सपाटीकरण करण्यात येणार आहे. त्याचसोबत, साईट कार्यालय, सुरक्षा कक्ष, शौचालय, २५० मीटरची मलवाहिनी, १५० किमींचा पोहोच रस्ता आणि त्यालगत गटार ही कामे करण्यात येणार आहेत.

या कामांची ठाणे महापालिका आयुक्तांनी बुधवारी पाहाणी करत ही सर्व कामे निश्चित कालमयार्देत पूर्ण करावीत, असे निर्देश दिले आहेत. या प्रकल्पासाठी वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक वीज वाहिनीचे कामही जलद करावे, अशा सूचना आयुक्त राव यांनी दिल्या. या पाहणीदरम्यान, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड आणि शुभांगी केसवानी, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी उपस्थित होते.

# उल्हासनगरातील श्वान निर्बिजीकरण केंद्र सुरू
## श्वानांच्या निर्बिजीकरणाचे आव्हान



**■उल्हासनगर :** गेल्या अनेक महिन्यांपासून ठप्प असलेली भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरणाची प्रक्रिया अखेर सुरू करण्यात उल्हासनगर महापालिका प्रशासनाला यश आले आहे. कंत्राटदार मिळत नसल्याने उल्हासनगर शहरातील श्वान निर्बिजीकरण पूर्णपणे ठप्प होते. अखेर नवा कंत्राटदार मिळाल्याने आता श्वान निर्बिजीकरण प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. शहरात सुमारे ४ हजार भटके श्वान असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे वेळेत या श्वानांचे निर्बिजीकरण करण्याचे आव्हान पालिका प्रशासनापुढे आहे.

उल्हासनगर शहरात गेल्या काही महिन्यात भटक्या श्वानांची संख्या वाढल्याचे दिसून आले होते. भटक्या श्वानांकडून नागरिकांवर हल्ले होण्याचे प्रकारही वाढले होते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण होते. रात्रीच्या वेळी, पहाटे लवकर घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांवर भटक्या श्वानांकडून हल्ले केले जात होते. त्यामुळे भटक्या श्वानांचा वेळीच बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात होती. त्याचवेळी उल्हासनगर महापालिका क्षेत्रात निर्बिजीकरण करणाऱ्या संस्थेचा कंत्राट संपल्याची माहिती समोर आली होती.

नवा कंत्राटदार नेमला गेला नसल्याने निर्बिजीकरण प्रक्रिया ठप्प झाली होती. त्यामुळे पालिका क्षेत्रात भटक्या श्वानांचा उच्छाद वाढला होता. उल्हासनगर महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणानुसार, उल्हासनगर शहरात सध्या १४ हजार भटके श्वान आहेत. तर २०२३ मध्ये निर्बिजीकरण केंद्र सुरू झाल्यापासून १० हजार श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले आहे. तरीही ४ हजार श्वानांचे निर्बिजीकरण करण्यासाठी नव्या कंत्राटदाराला जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे आता शहरात पुन्हा निर्बिजीकरण प्रक्रियेला वेग येण्याची आशा आहे.

**निर्बिजीकरण प्रक्रिया करताना श्वानांवर उपचार**

निर्बिजीकरण प्रक्रिया करताना श्वानांवर उपचार करून त्यांना काही काळ पालिकेच्या केंद्रात ठेवले जाते. त्यानंतर त्यांना सुखरूप अधिवासात सोडले जाते. त्यासाठी पालिकेचे केंद्र अस्तित्वात आहे. आता निर्बिजीकरण आणि लसीकरण प्रक्रिया केली जाते आहे.

# तडीपार असूनही शहरात चोरीचा प्रताप
## २३ वर्षीय सराईत चोराला अटक, लाखोंचा मुद्देमाल जप्त

**■उल्हासनगर :** गेल्या वर्षात तडीपार करण्यात आलेला एक चोरटा उल्हासनगरात दुचाकींची चोरी करत असल्याची बाब समोर आली होती. अखेर पोलिसांनी सापळा रचत या तडीपार चोराला अटक केली आहे. हितेश कटेजा असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून ८ चोऱ्यांचे गुन्हे उघडकीस आले आहेत. यावेळी पोलिसांनी ४ लाख २५ हजारांचा मुद्देमालही हस्तगत केला आहे.

उल्हासनगरच्या कॅम्प चार भागातील साई प्रेरणा इमारतीमधून २५ मार्च रोजी मध्यरात्री एक सुझुकी बर्गमन स्ट्रीट ही दुचाकी चोरीला गेली होती. त्याची तक्रार मालक सुनील कारीरा (वय ५३) यांनी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने सीसीटीव्ही चित्रणाचा आधार घेत संशयीत आरोपीचा शोध सुरू केला होता. त्यानंतर पोलिसांनी मोठ्या शिताफीने ३० मार्च रोजी ॲक्टिवा स्कूटीसह हितेश कटेजाला सापळा रचून अटक केली.

अटक केल्यानंतर चौकशीत हितेशने ही स्कूटी उल्हासनगर कॅम्प दोन मधून चोरी केल्याचे कबुल केले. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रण त्याने गुन्हा मान्य केला. त्यानंतर शहरातील विविध भागांतून चोरी केलेल्या तब्बल आठ दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या. या दुचाकींची एकूण किंमत ४ लाख २५ हजार रुपये इतकी आहे. तसेच तपासात त्याने विठ्ठलवाडी, मध्यवर्ती आणि हिललाईन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोटारसायकली चोरल्या आणि त्या विक्रीसाठी ठेवल्याचे माहिती पोलीसांनी दिली आहे. हा आरोपी गेल्या वर्षात तडीपार करण्यात आला होता.

**चोरी करण्यासाठी विशेष पोषाख**

हा आरोपी चोरी करण्यासाठी विशेष पोषाख परिधान करत असल्याची माहिती समोर आली आहे. कुणालाही संशय येऊ नये म्हणून हा आरोपी नामांकीत कंपनीचे जॅकेट परिधान करून तोंडाला कपडा बांधून चोरी करत होता. दुचाकी चोरीचे पाच सिसिटीव्ही चित्रण मिळवले असून या सर्व चोऱ्यांमध्ये त्याने असाच पोषाख वापरल्याचे दिसून आले आहे.

**आंबिवलीच्या इराणी वस्तीत विक्री**

दुचाकी चोर हितेश याला मौजमजा करण्यासाठी पैशांची गरज होती. त्यामुळे अनेक दुचाकी चोरीनंतर आंबिवली मोहने येथील इराणी वस्तीत कमी किमतीत विकल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी इराणी वस्तीमधून या दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत.

**असा ताब्यात आला आरोपी**

३० मार्च रोजी विठ्ठलवाडी मध्यरात्री ३ वाजता पोलीस आरोपी हितेशचा पाठलाग करत होते. मात्र हितेश पोलिसांना चकवा देत एका इमारतीत शिरला. आपली ओळख पटू नये म्हणून आरोपीने प्रत्येक गुन्ह्यात वापरत असलेला पोषाख काढून टाकला. त्यानंतर आरोपी चड्डी झ बनियानवर इमारतीच्या बाहेर आला. त्याचवेळी पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली असता काही झालेच नाही अशा अविर्भावात तो पोलिसांना आपण मित्राकडे आलो होतो, असे सांगितले. मात्र पोलिसांनी सिसिटीव्ही चित्रण आणि पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने तात्काळ आपला गुन्हा कबूल केला.




# बनेली भागातून अल्पवयीन शाळकरी मुलगी बेपत्ता

**■कल्याण :** टिटवाळा येथील बनेली परिसरातून एक १५ वषार्ची अल्पवयीन शाळकरी मुलगी बुधवारी राहत्या घरातून बेपत्ता झाली आहे. या मुलीच्या आई, वडिलांनी आपले नातेवाईक, घर परिसरात खूप शोध घेतला पण ती आढळून आली नाही. त्यामुळे मुलीला कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याचा संशय घेत कुटुंबीयांनी टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.मुलीच्या आईने टिटवाळा पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आम्ही पती, पत्नी, आमची तीन मुले टिटवाळा बनेली भागात राहतो.

आमची १५ वषार्ची मुलगी टिटवाळा भागातील एका शाळेत इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. बुधवारी तिची तब्येत ठिक नव्हती. म्हणून ती शाळेत गेली नाही. मुलीचे वडील टॅक्सी चालक आहेत. मी स्वता मुंबईतील आस्थापनेत खासगी नोकरी करते. बुधवारी अकरा वाजेपर्यंत मुलगी घरात होती. दुपार दोन नंतर मुलीचे वडील घरी आले. तेव्हा घराच्या दरवाजाला कुलूप होते. म्हणून त्यांनी आपल्या मुलीला संपर्क केला. तिने प्रतिसाद दिला नाही. मुलगी प्रतिसाद देत नाही म्हणून आई, वडिलांनी टिटवाळा, बनेली परिसरात, आपल्या नातेवाईक, मुलीच्या मैत्रिणींकडे तपास केला. ती कोठेही आढळून आली नाही. त्यामुळे मुलीला कोणीतरी फूस लावून पळवून नेला असल्याचा संशय व्यक्त करत मुलीच्या आईने टिटवाळा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली आहे. मुलगी हिंदी भाषिक आहे. तिच्याकडे रेडमी कंपनीचा मोबाईल आहे, असे तक्रारीत म्हटले आहे. टिटवाळा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून बेपत्ता मुलीचा शोध सुरू केला आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी डोंबिवली पूर्वेतील शिळफाटा भागात एका घरातील दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. डोंबिवली, कल्याण परिसरातून अल्पवयीन मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत चालल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गेल्या आठवड्यात शिळफाटा रस्त्यावरील रिजन्सी अनंतम गृहसंकुल भागात एका रिक्षा चालकाने एका बालकाचे खंडणीसाठी अपहरण केले होते. मानपाडा पोलिसांनी शिताफीने तपास करून तीन तासाच्या आत बालकाची अपहरणकर्ता रिक्षा चालकाच्या तावडीतून बालकाची शहापूर परिसरातून सुटका केली होती. दोन कुटुंबीयांमधील घरघुती वादातून मुलांना लक्ष्य केले जात असल्याच्या तक्रारी आहेत.

टिटवाळा परिसरात बेकायदा चाळींमध्ये स्वस्तात घर मिळत असल्याने मुंबई परिसरातील झोपड्या, चाळींमधील रहिवासी याठिकाणी कायमस्वरुपीसाठी निवासासाठी दाखल झाले आहेत. घरासमोरील जागेचे वाद आणि किरकोळ विषयांवरून त्यांच्यात भांडणे होतात. त्याचा राग मुलांवर काढण्यात येत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येते.

# सावरकर रस्त्यावर गावठी दारूचा अड्डा उध्दवस्त

**■डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेतील सावरकर रस्ता या मध्यमवर्गीय वस्ती असलेल्या भागात आंबेडकर नगर मधील मोकळ्या जागेत एक इसम गावठी (हातभट्टी) दारूची विक्री करत असल्याच्या वाढत्या तक्रारींची दखल घेऊन रामनगर पोलिसांनी हा गावठी दारूचा अड्डा उद्धवस्त केला.दारू विक्रेता सुनील दाजी गुरव (५३) यांच्या विरुध्द रामनगर पोलीस ठाण्याचे हवालदार अजय बागुल यांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कायद्याने गुन्हा दाखल केला आहे. सावरकर रस्त्यावरील आंबेडकर वसाहतीजवळील सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या कोपऱ्यावर अनेक महिन्यांपासून संध्याकाळपासून रात्री उशिरापर्यंत एक इसम गावठी दारू विकत असल्याच्या तक्रारी रामनगर पोलीस ठाण्यात नागरिकांकडून करण्यात येत होत्या.

पाच दिवसापूर्वी रामनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या सूचनेवरून साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पाटणे, हवालदार कोळी, शिंदे यांनी सावरकर रस्त्यावरील दारू अड्ड्यावर छापा टाकण्याची तयारी केली. हा अड्डा संध्याकाळी किती वाजता सुरू केला जातो. या अड्ड्यावर छापा टाकला तर तेथून दारू अड्डा चालक, ग्राहकांना पळण्यासाठी किती चोरीचे मार्ग आहेत. अशी सर्व माहिती पोलीस पथकाने काढली.

आंबडेकर वसाहतीच्या बाजुला सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या कोपऱ्यावर प्लास्टिक डबा, प्लास्टिक पिशव्यांमध्ये बांधलेली दारूची पुडकी घेऊन इसम बसत असल्याची खात्री पोलिसांना पटली. पोलिसांनी चारही बाजुने दारू अड्ड्याला वेढून या अड्ड्यावर छापा टाकला. या अड्ड्यावरून सुनील गुरव या दारू विक्रेत्याला अटक केली. या दारू अड्ड्यावर पोलिसांचा छापा पडला आहे याची माहिती मिळताच दारू पिण्यासाठी आजुबाजुला येऊन थांबलेले ग्राहक पळून गेले.

पोलिसांनी साक्षीदार, पंचांसह या दारू अड्ड्यावरील साहित्य जप्त केले. दारू साठ्याची विल्हेवाट लावली. सुनील गुरव यांच्या विरुध्द दारू प्रतिबंधक कायद्याने गुन्हा दाखल केला आहे. मुख्य वर्दळीच्या मध्यवगीर्यांची वस्ती असलेल्या भागात हा दारू अड्डा सुरू असल्याने नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करत होते. अनेक ग्राहक या अड्ड्यावर दारू पिऊन दारूच्या धुंदीत परिसरात सार्वजनिक रस्त्यावर धिंगाणा घालत होते. शांततेचा भंग करत होते. अनेक वाहन चालकांना या धुंदीतील दारूड्यांचा त्रास होत होता. काही मद्यपी पादचाऱ्यांना अडवून त्यांच्याशी हुज्जत घालण्याचे प्रकार करत होते. त्यामुळे हा दारू अड्डा बंद करावा, अशी नागरिकांची मागणी होती. रामनगर पोलिसांनी हा दारू अड्डा बंद केल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com